

# सांस्कृतिक वातावरणाने बहरला तरुणाईचा रंग

कला वाणिज्य व विज्ञान बोदवड महाविद्यालयात दिनांक १५ जानेवारी २०१८ रोजी युवती सभा व सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्त विद्दमाने महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थीनीसाठी साडी डे, विविध वेषभुषा व खाद्यपदार्थांचे स्टॉल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सर्व कार्यक्रमाचे उदघाटन विद्यापीठ प्रतिनिधी कु.शुभांगी येसकर हीच्या हस्ते फित कापुन करण्यात आले. प्रमुख अतिथे म्हणून महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. अरविंद चौधरी उपप्राचार्य डी.एस पाटील, विद्यापीठ प्रतिनिधी कु.शुभांगी येसकर उपस्थित होते.सर्व अतिथिंनी विविध खाद्यपदार्थ स्टॉलला भेट देवून खाद्यपदार्थ खाण्याचा आनंद लुटला.

महविद्यालयत विद्यार्थीनी विविध रंगाच्या साड्या नेसुन आल्या होत्या तर अनेक विद्यार्थी व विद्यार्थीनी पारंपारीक वेषभुषा करुन महाविद्यालय आवारात कलाकौशल्य दर्शवित होते. एकुणच महाविद्यालयातील वातावरण व अनुरुप संगित यांमुळे महाविद्यालयातील वातावरण प्रफल्लित व आंनददायी झालेल होत.

संपुर्ण कार्यक्रम यशस्वि करण्यासाठी प्रा.डॉ.कामिनी तिवारी, प्रा.डॉ, गिता पाटील, प्रा.डॉ.अनिल बारी, प्रा.डॉ.मनोज निकाळजे, प्रा.रत्ना जवरास , प्रा. डॉ.व्ही.पी चौधरी, सर्व प्राध्यापक, विद्यार्थी प्रतिनिधी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मेहनत घेतली.



